**अनुसूचित जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी समिती.**

**ठाणे, औरंगाबाद व अमरावती येथील अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची स्थापना आणि पुणे, नाशिक व नागपूर येथील अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची पुनर्रचना.**

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्र.एसटीसी-१०९९/प्र.क्र.१३८(भाग-२)/का.१०
मंत्रालय विस्तार, मुंबई-३२
दिनांक : १२ मार्च , २००१

**वाचा :-** (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१०९९/प्र.क्र.१३८/का.१०, दिनांक : ६ सप्टेंबर, २०००.

(२) शुध्दिपत्र, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१०९९/प्र.क्र.१३८/का.१०,दिनांक : ६ ऑक्टोबर, २०००.

(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी- १०९९/प्र.क्र.१३८/का.१०, दिनांक: ९ ऑक्टोबर, २०००.

**शासन निर्णय :-** अनुसूचित जमातींसाठी ७ टक्के राखीव असलेल्या पदांवर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात येते. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थांमध्ये देखील राखीव पदांवर नियुक्ती करण्यात येते. सदर जागा भरतांना जाती प्रमाणपत्रासबंधिचे वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्याची तरतूद आहे. पुणे, नाशिक व नागपूर येथे अस्तित्वात असलेल्या तीन समित्यांकडील कामाचा व्याप वाढल्यामुळे नवीन ३ समित्या व सदर समित्यांना सहाय्य करण्यासाठी नवीन ३ दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली आहे. तथापि, वरील ३ नवीन समित्यांसाठी आवश्यक असलेल्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे व ३ नवीन दक्षता पथकांसाठी आवश्यक असलेल्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास काही प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्यामुळे ठाणे, औरंगाबाद व अमरावती येथील ३ नवीन समित्यांसाठी मंजूर केलेली पदे भरली नव्हती म्हणून ३ नवीन समित्यांचे कामकाज पुणे, नागपूर व नाशिक येथील जुन्या समित्यांकडे सोपविण्यात आले होते. आता नवीन ३ समित्यांसाठी आवश्यक असलेली अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे व नवीन ३ दक्षता पथकांसाठी आवश्यक असलेली अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आली आहेत. त्यामुळे आता या समित्यांचे कामकाज सुरु करण्यास अडचण येणार नाही. हे लक्षात घेता शासन निर्णय, क्रमांक : एसटीसी-१०९९/प्र.क्र.१३८/का.१०, दिनांक ९ ऑक्टोबर, २००० अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत व शासन निर्णय, क्रमांक : एसटीसी-१०९९/ प्र.क्र.१३८/ का.१०, दिनांक ६ सप्टेंबर, २००० अन्वये दिलेले आदेश दिनांक १५.३.२००१ पासून अंमलात येत आहेत.

२. पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे, औरंगाबाद व अमरावती येथील तपासणी समित्यांची कार्यकक्षा पुढील प्रमाणे राहील :-

| समिती | जिल्हा | महसूल विभाग |
|---|---|---|
| (१) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१. | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर | पुणे विभाग |

२६९

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
24 MAR 2001

| | | |
|---|---|---|
| (२) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, रमाबाई आंबेडकर कन्या शाळेजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक-४२२ ०२२. | नाशिक,धुळे,नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, | नाशिक विभाग |
| (३) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन,गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर-४४० ०१०. | वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया | नागपूर विभाग |
| (४) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे. | मुंबई शहर, मुंबई उपनगर,ठाणे,रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | कोकण विभाग |
| (५) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, काश्मिरा भवन, सेवायोजन कार्यालयाजवळ, स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१ ००१. | औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद,लातूर,हिंगोली | औरंगाबाद विभाग |
| (६) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती | बुलढाणा,अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ. | अमरावती विभाग |

दिनांक १५ मार्च, २००१ पासून ठाणे, औरंगाबाद, अमरावती या ३ नवीन समित्यांनी व त्यांना सहाय्य करणाऱ्या ३ नवीन दक्षता पथकांनी त्यांचे कामकाज स्वतंत्रपणे सुरु करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने ,

( दि.वा.जोशी )
कार्यासन अधिकारी

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव.
मुख्यमंत्री यांचे सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
मंत्री / राज्यमंत्री, (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
अतिरीक्त मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय , मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.

- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.
- प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
- प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
- प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई.
- प्रबंधक, उच्च न्यायालय ( मूळ शाखा), मुंबई
- प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर.
- प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.